# जिल्हा परिषद पालघर
# जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन

जा.क्र.पाजिप/पावस्व/स्वभामि(ग्रा)/३८८ /२०२५ दिनांक- १४/०७/२०२५

प्रति,

गट विकास अधिकारी,
पंचायत समिती डहाणु, जव्हार, पालघर, तलासरी, वसई, विक्रमगड व वाडा

विषय :- स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५ च्या गाव पातळीवरील तपासणी करणे बाबत

संदर्भ :- १. मा. अति. अभियान संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन यांचेकडील पत्र रापावस्वमि फाईल क्र. समुशा/प्र.क्र.५८/२०२५/१२९० दिनांक ०६.०६.२०२५
२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांचेकडील पत्र पाजिप/जिपावस्वमि/स्वभामि(ग्रा) टप्पा-२/३६७/२०२५-२६ दिनांक २६.०६.२०२५

स्वच्छ भारत मिशन ग्रमीणच्या अनुषंगाने सन २०२५-२६ मध्ये स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण अंतर्गत राज्यातील ग्रामीण भागात Academy of Mannagement Studies या केंद्र पुरस्कृत त्रयस्थ यंत्रणेकडुन गावांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. यामध्ये कटुंबस्तर आणि गावातील सार्वजनिक ठिकाणांचे सर्वेक्षण केले जाणार आहे. तसेच जिल्हा आणि तालुका प्रकल्पांची ( प्लास्टिक कचरा व्यवस्थापन, गोबरधन, मैला गाळ व्यवस्थापन) पाहणी केली जाणार आहे.

पालघर जिल्ह्यामध्ये सदर तपासणी दिनांक १५.०७.२०२५ रोजी पासुन सुरु होणार असल्याचे राज्यस्तरावरुन कळविण्यात आले आहे. सदर तपासणी कमिटी प्रती तालुका, प्रती दिवस दोन गावांची तपासणी करणार आहे. तसेच दिनांक १५.०७.२०२५ पासुन डहाणु तालुका व पालघर तालुक्यापासुन स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५ च्या तपासणीची सुरुवात करण्यात येणार आहे व तसेच इतर तालुक्यामध्ये तपासणी सुरु होण्याअगोदर तसे जिल्हास्तरावरुन सूचित करण्यात येईल.

स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५ च्या गावतपासणी दरम्यान जिल्हास्तरावरील एक सल्लागार व तालुकास्तरावरील गट/समुह समन्वयक/ अभियंता (स्व.भा.मि.) हे प्रत्येकी एका कमेटी सोबत उपस्थित राहतील व तपासणी कमिटीस तपासणी करिता सहकार्य करतील.

गट विकास अधिकारी यांनी आपल्या तालुक्यातील विस्तार अधिकारी व कनिष्ठ अभियंता, ग्रा.पा.पु. यांची तपासणी कालावधीकरिता नोडल अधिकारी म्हणुन नेमणुक करुन ग्रामपंचायती वाटप करुन देण्यात याव्यात. त्याअनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची प्रत या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावी.

स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५ अंतर्गत करण्यात येणा-या तपासणीचे काम व्यवस्थित रित्या पुर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

**टिप :- तपासणी करण्यात येणा-या गावांची यादी सोबत जोडण्यात आली आहे.**

प्रकल्प संचालक (जजीमि)
जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन
जिल्हा परिषद पालघर

क्र. 211, नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हा परिषद पालघर, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, बोईसर रोड, पालघर नवनगर, पालघर (प)
Email- palgharsbm@gmail.com, Email- actdwsm@gmail.com